# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 January 2026

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १८ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- देशातल्या पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
- युवकांना परदेशात रोजगार संधीसाठी आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था स्थापनेचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात–काँग्रेसची मागणी
- जिल्हा परिषद निवडणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज

आणि

- प्रख्यात इतिहासकार डॉ. रामचंद्र मोरवंचीकर यांचं निधन

****

देशातल्या पहिल्या वंदे भारत शयनयान रेल्वेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. ही रेल्वे मालदा रेल्वे स्थानकातून हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणार आहे. यावेळी केलेल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवला. यात अलीपूरद्वार – पनवेल गाडीचाही समावेश आहे.

****

राज्यातल्या युवकांना परदेशात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था स्थापन करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

मुंबईत नागरी परिवहन प्रकल्प टप्पा दोन साठीच्या सुधारित खर्चालाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. शिवडी – न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकर शुल्काला आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं काल घेतला. मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थानं बांधायला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

राज्यातील भाजीपाला निर्यातीसाठी ठाणे जिल्ह्यातल्या मौजे बापगांव इथं मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी पणन महामंडळाला सात हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

यवतमाळ जिल्ह्यातल्या बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या निधीला काल या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

****

महानगरपालिका निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपचं अभिनंदन केलं. ते काल पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. पक्षाचे नेते एकत्र बसून निवडणूक निकालाचं विश्लेषण करतील असं पवार म्हणाले. प्रत्येक पक्ष मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असतो, भाजपने यात लक्षणीय यश मिळवल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भारतीय जनता पक्षानं कागदावरती शिवसेना संपवली असेल, पण जमिनीवरची शिवसेना ते संपवू शकत नाहीत, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते काल, मुंबई तसंच राज्यात इतर महापालिका निकालाच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. मुंबई महापालिकेत ६५ उमेदवार निवडून आल्याबद्दल त्यांनी यावेळी मुंबईकरांचे आभार मानले.

****

काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ नेते अशोक उर्फ भाई जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. महापालिका निकालानंतर जगताप यांनी माध्यमांशी बोलतांना, काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष डॉ वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. हे विधान पक्षाची प्रतिमा मलीन करणारं असल्याने, ही नोटीस बजावण्यात आली. या नोटीसचं सात दिवसांत उत्तर द्यावं, अन्यथा कारवाईचा इशारा पक्षाने जगताप यांना दिला आहे.

****

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. यासंदर्भात पटोले यांनी, राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. नुकत्याच झालेल्या मनपा निवडणुकीत मतदानाची घसरलेली टक्केवारी ही, निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचं निर्दशक असल्याची टीका पटोले यांनी या पत्रात केली आहे.

****

पुणे महानगरपालिकेतल्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे दोन्ही पक्ष आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रितपणे लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पुण्यात ही माहिती दिली. महानगरपालिका निवडणुकीतील पराभवाचं आत्मचिंतन करून दोन्ही पक्ष नव्या दमानं पुढे जातील, असं शिंदे यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद निवडणुकीत सुमारे पावणे एकोणीस लाख मतदार मतदान करणार असून, यासाठी दोन हजार दोनशेहून अधिक मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल पत्रकार परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली, ते म्हणाले..

**बाईट – जिल्हाधिकारी दिलीप स्वामी**

****

धाराशिव जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी काल इच्छुकांनी एक हजार ९३ नामनिर्देशनपत्रं प्राप्त करून घेतली. त्यासोबतच जिल्हा परिषद गटांसाठी चार तर पंचायत समिती निवडणुकीसाठी १ असे एकूण ५ नामनिर्देशनपत्रं काल दाखल झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेसह दहा पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली काल राजकीय पक्ष पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. राज्य निवडणूक आयोगानं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसाठी दिलेले दिशानिर्देश-निवडणूक प्रक्रियेतील नियम यांची सविस्तर माहिती आणि त्याच्या काटेकोर पालनाची गरज याबाबत पदाधिकाऱ्यांना सूचित करण्यात आलं.

****

जिल्हा परिषद तसंच पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आडगाव इथं काल शिवसेनेच्या वतीने पैठणचे आमदार विलास भूमरे यांच्या उपस्थितीमध्ये कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी निवडणुकीच्या अनुषंगाने भुमरे यांनी मार्गदर्शन केलं.

****

प्रख्यात इतिहासकार, संशोधक, लेखक डॉ. रामचंद्र मोरवंचीकर यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं अल्पशा आजाराने निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. लोकसंस्कृती कशी विकसित होत गेली, याचा अभ्यास करण्यासाठी पाणी हा इतिहासाचा केंद्रबिंदू मानून ज्यांनी अभ्यास केला, त्यात मोरवंचीकर यांचं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. पैठण इथल्या उत्खननात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात माजी इतिहास विभागप्रमुख तसंच पर्यटन प्रशासन विभागाचे माजी संचालक म्हणून त्यांनी काम केलं आहे. प्रसिद्ध वेरूळ महोत्सव सुरू करण्यासाठी त्यांनी प्रशासनाच्या पुढाकाराने मोलाचे प्रयत्न केले. राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावरचे २०० संशोधनात्मक निबंध, तर इतिहास आणि इतर विषयातील १६ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. मराठवाडा विद्यापीठाने त्यांना जीवन साधना पुरस्काराने सन्मानित केलं होतं. मोरवंचीकर यांच्या पार्थिव देहावर आज प्रतापनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

जातीभेद संपवण्यासाठी जात न पाहण्याची सवय प्रामाणिकपणे अंगिकारल्यास, पुढच्या दशकभरात जातीभेद संपुष्टात येईल, असा विश्वास सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी वर्तवला आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित काल छत्रपती संभाजीनगर इथं जनसंगोष्ठी अर्थात लोकचर्चेत ते बोलत होते. उपस्थित नागरिकांनी लिखित स्वरूपात विचारलेल्या अनेक शंकांचं त्यांनी सविस्तर निराकरण केलं. दरम्यान, भागवत यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं युवा उद्योजकांनाही मार्गदर्शन केलं. स्वदेशीचा वापर म्हणजे तंत्रज्ञान नाकारणं असं नाही, परंतु आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होता कामा नये, असं त्यांनी सांगितलं.

****

बीड इथल्या श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना–NCC च्या दोन कॅडेड्सची भारतीय नौसेनेत निवड झाली आहे. सुदीप अर्जुन राहिंज आणि कपिल रामकृष्ण नागरगोजे अशी या विद्यार्थ्यांची नावं आहेत. महाविद्यालयाच्या वतीने या दोघांचा सत्कार करण्यात आला. शेतकरी कुटुंबातल्या या मुलांनी आर्थिक अडचणींवर मात करून हे यश मिळवल्याबद्दल त्यांचं कौतुक होत आहे.

****

जालना इथं लागू झालेली संचारबंदी रात्रीपासून शिथील करण्यात आली. धनगर समुदायाचा समावेश अनुसूचित जमातीत करायच्या मागणीसाठी होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, जालना तसंच अंबड शहरात काल संचारबंदी लावण्यात आली होती. दरम्यान, पोलिसांनी काल धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांना ताब्यात घेतलं. न्यायालयानं त्यांना काही अटी, शर्तींवर घरी पाठवल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

****

राज्यात काल सर्वात कमी आठ पूर्णांक तीन दशांश सेल्सियस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल नागपूर इथं दहा पूर्णांक दोन तर जळगाव इथं साडे दहा अंश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात मात्र गेल्या दोन दिवसांपासून तापमानात वाढ झाली आहे.

****